मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पोलिसांच्या कामगिरीवर माझा ठाम विश्वास : पालकमंत्री चंद्रकांत पाटील

## विनयकुमार चौबे यांना वैशिष्ट्यपूर्ण सेवेसाठी राष्ट्रपती पदक

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी ।**

**पोलीस कुठल्याही गुन्ह्याचा शोध २५ तासात लावतात, यावर माझा ठाम विश्वास आहे, असे मत पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले. पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांना वैशिष्ट्यपूर्ण सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदक जाहीर झाले. त्याबद्दल पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने आयुक्त चौबे यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.**



### महिलांच्या संरक्षणात पोलीस यशस्वी

» आमदार उमा खापरे म्हणाल्या, शहरातील प्रत्येक नागरिक पोलिसांकडे आपले प्रश्न घेऊन जाऊ शकतो. तसे वातावरण शहरात निर्माण झाले आहे. महिलांच्या संरक्षणात पिंपरी चिंचवड पोलीस यशस्वी ठरले आहेत. यापुढेही महिलांची सुरक्षा पोलिसांनी अबाधित ठेवावी. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांना जाहीर झालेल्या राष्ट्रपती पोलीस पदकासाठी शुभेच्छा.

या कार्यक्रमात चंद्रकांत पाटील बोलत होते. चंद्रकांत पाटील म्हणाले, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांना वैशिष्ट्यपूर्ण सेवेबद्दल राष्ट्रपती पोलीस पदक मिळाले. हे पदक खूप मोठे आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन आणि त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो. पोलिसांना चांगलं म्हणणं, त्यांचा सन्मान करणं हे फार रेअर असतं. ते आपल्याला वाढवायला हवं. अभिनंदन आणि शुभेच्छांमुळे पोलिसांना काम करण्याला उत्साह येतो. पोलीस कुठल्याही गुन्ह्याचा शोध २४ तासात लावतात, यावर माझा ठाम विश्वास आहे. पुणे शहरात मागील काही काळात आतंकवाद्याची लिंक सापडली. त्याचे धागेदोरे फार लांबपर्यंत जात आहेत. पुणे, पुणे जिल्हा आणि पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या सक्षमीकरणासाठी ४० कोटी जिल्हा नियोजन निधी मधून तर ६० कोटी रुपये इतर माध्यमातून दिले जाणार आहेत. पोलीस चौक्यांचे सक्षमीकरणासाठी आणखी काम करणे गरजचे असल्याचे पालकमंत्री म्हणाले. अंमली पदार्थ तरुणाईला खात आहेत. त्याला कुठलेही अभय देऊ नका. शक्य त्या पर्यायाचा अवलंब करा. महिलांच्या सुरक्षेसाठी दामिनी पथक आणखी सक्षम करा, असा सल्ला देखील पालकमंत्र्यांनी पोलिसांना दिला.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, पोलीस आयुक्तांना जाहीर झालेल्या राष्ट्रपती पोलीस पदकाबद्दल त्यांचे अभिनंदन. चौबे यांनी २६ वर्ष केलेल्या सेवेबद्दल त्यांना राष्ट्रपती पोलीस पदकाने गौरविण्यात येणार आहे. मी माझ्या कारकिर्दीत अनेक पोलीस अधिकारी पाहिले. पण खऱ्या अर्थाने त्या पदाला न्याय देण्याचे काम पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी केले आहे. अनेकदा राजकीय मंडळींच्या दबावामुळे पोलिसांवर मर्यादा येतात. गुन्हेगाराला वेळेत शासन न झाल्याने हवी ती जरब बसत नाही. लोकहितासाठी जर प्रत्येक राजकीय नेत्याने काम केले तर पोलिसांना वेगळे काम करण्याची गरज राहणार नाही. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांचे काम खूप चांगले आहे. शहरासोबत गुन्हेगारी वाढत आहे. ती कमी करण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत.

# बोऱ्हाडेवाडी येथे कचरा स्थानांतर केंद्राऐवजी उद्यानच करा

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आयुक्त शेखर सिंग यांना सूचना

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

**बोऱ्हाडेवाडी, मोशी येथे आम्ही घरे घेतली हा आम्ही गुन्हा केला का? असा प्रश्न उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या समोर सोसायटी धारक प्रतिनिधींनी केला.**

कविता अल्हाट व अतिश बारणे यांच्या नेतृत्वाखाली सोसायटीधारकांनी घेतली उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची भेट बोऱ्हाडेवाडी, मोशी येथे सर्व्हे २३० (१३४७) मध्ये महापालिकेच्या वतीने घनकचरा व्यवस्थापन कायद्यानुसार कचरा स्थानांतर केंद्र उभा करण्याचा प्रस्ताव आहे. अगोदरच मोशीमध्ये कचरा डेपो आहे. तसेच रिव्हर रेसिडेन्सी येथील रद्द करण्यात आलेला सांडपाणी प्रकल्प त्याच्याच खाली २०० मीटर वर सुरू असून त्याचे काम वेगाने सुरू आहे. त्यातच आता प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रत्येकी दोन कचरा स्थानांतर केंद्र करण्यात येणार आहेत. जुना प्रभाग क्रमांक २, ६, ८ व ९ यापैकी बोऱ्हाडेवाडी येथेच एक कचरा स्थानांतर केंद्र उद्यानाची जागा आरक्षित असताना त्याच जागेवर हे केंद्र उभा करण्यात येत असल्याने नागरिकांमध्ये असंतोष पसरला होता. अतिश बारणे व महिला आघाडीच्या अध्यक्षा प्रा.कविता आल्हाट यांनी माजी आ. विलास लांडे व राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरातील सोसायटीतील पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री



### एकतर्फी निर्णय घेऊ नका

» महापालिका प्रशासनाने याठिकाणी हॉर्स रायडिंग साठी जागा आरक्षित केल्यामुळे परिसरातील मुलांनी खेळण्यासाठी खासगी व्यवसायिकाकडे पैसे मोजून खेळायचे का असा सवाल ही उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या समोर उपस्थित केला. त्यासंदर्भात ही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुलांनी सराव व खेळ कोठे खेळायचे असा सवाल आयुक सिंग यांना केला आहे. आपण काही निर्णय एकतर्फी घेत आहात. यापुढे असे चालणार नाही.

अजितदादा पवार यांची भेट घेऊन आपल्या भावना व्यक्त केल्या. देवगिरी बंगल्यावर उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भेटलेले शिष्टमंडळ नागरिकांच्या प्रतिक्रिया ऐकल्यानंतर अजित पवार यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंग यांना दूरध्वनी वरून संपर्क साधत माझ्या कार्यकर्त्यांना वाली नाही असे समजू नका, त्यांनी मांडलेले प्रश्न ही सोडविण्यासाठी प्राधान्य द्या, एकतर्फी निर्णय घेऊ नका, नागरिकांच्या मागणी नुसार ज्या त्या मुद्द्याला प्राधान्य द्या अशा सूचना देत बोऱ्हाडेवाडी येथील कचरा स्थानांतर केंद्र हलवून त्याठिकाणी उद्यानाच करा असा आदेश दिला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेल्या सूचनेला मान्यता देत कचरा स्थानांतर केंद्राऐवजी उद्यान उभा करण्यात येईल असे आश्वासन दिले आहे. बोऱ्हाडेवाडी, मोशी येथे कचरा स्थानांतर केंद्र ऐवजी उद्यान व मोकळे मैदान आरक्षण १/१३७ वर हॉर्स रायडिंग ऐवजी क्रीडांगण विकसित करावे याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सूचनेनुसार आयुक्त शेखर सिंग यांना भेटून सविस्तपणे चर्चा करून त्याबाबत नागरीकांच्या मागण्यांचे निवेदन देताना राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, उपाध्यक्ष अतिश बारणे, महिला आघाडीच्या अध्यक्षा कविता आल्हाट, वसंत बोराटे, चिखली मोशी फेडरेशनचे अध्यक्ष विकास साने व सोसायटी धारकांचे प्रतिनिधी यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भेटणाऱ्या शिष्टमंडळात अश्विनी सस्ते, जीवन सस्ते काशिनाथ धरी, उमेश उगीले, विनोद शिर्के, प्रभाकर गुरव, चंद्रकांत बिरादार,विठ्ठल अहिरे, अप्पासाहेब कोळी, बंडू मजगे, वैभव थोरात, प्रवीण सूर्यवंशी, अरुण जाधव, प्रकाश पवार, दिनेश पाटील आदी उपस्थित होते.

# अश्वारोहनासाठी क्रीडांगणाचे आरक्षण बदलले

## पिंपरी चिंचवड महापालिकेचा गजब कारभार

पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।

**पिंपरी चिंचवड महापालिकेने क्रीडांगणासाठी असलेले आरक्षण बदलून ते अश्वारोहणासाठी केले आहे. हे पूर्णतः चुकीचे असून बदललेले आरक्षण रद्द करून क्रीडांगणासाठी पूर्ववत आरक्षित करावे, अशी मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला शहराध्यक्ष कविता आल्हाट यांनी केली आहे. आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे निवेदनाद्वारे आल्हाट यांनी ही मागणी केली.**



### सर्वसामान्य नागरिकांना अश्वारोहन न परवडणारे

» प्रभागातील सामान्य नागरिकांच्या दृष्टीने अश्वारोहणाचा प्रस्ताव हा अनावश्यक आहे. या भागातील बहुतांश नागरिक सर्वसामान्य कुटुंबातील आहेत. त्यांना या खेळाबाबत पुरेशी माहिती नसून हा उच्चवर्गीयांचा खेळ त्यांना कदापी परवडणारा नाही. त्यामुळे हा प्रस्तावच अनावश्यक आहे. त्यामुळे हे आरक्षण रद्द करून क्रीडांगणासाठी पुन्हा निश्चित करण्याची मागणी कविता आल्हाट यांनी केली आहे.

कविता आल्हाट यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, प्रभाग क्रमांक २ ( जाधववाडी बोऱ्हाडेवाडी ) मध्ये पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विकास आराखड्यानुसार आरक्षण क्रं १/१३७ अन्वये खेळाचे मैदान / क्रीडांगणाचे आरक्षण आहे. सदर जागेस कुंपण घालण्यात आले आहे. शेजारी असणाऱ्या मोठ्या प्रमाणावरील गृहप्रकल्पातील लोकवस्तीमधील खेळाडू, विद्यार्थी या क्रीडांगणावर खेळण्यासाठी येत असतात. खेळाडूंकडून क्रिकेटच्या स्पर्धा भरविल्या जातात. तर अनेक जेष्ठ नागरिक, महिला व्यायाम व तंदुरुस्तीसाठी फिरण्यासाठी क्रीडांगणावर येतात. असे असताना देखील क्रीडांगणाचे हे आरक्षण बदलून त्या ठिकाणी अश्वारोहणासाठी आरक्षण जाहीर केले आहे. त्यानुसार कार्यवाही देखील केली जात आहे. सर्वसामान्यांसाठी उपयुक्त असणारे एक क्रीडांगण अश्वारोहणासाठी देणे चुकीचे आहे. तरी मनपा प्रशासनाने याची दखल घेऊन आरक्षण पुर्ववत क्रीडांगणाचे करावे. सामान्य नागरिकांना न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली. अन्यथा प्रशासनाविरोधात मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा अल्हाट यांनी दिला.

# ‘दिव्यांग विभाग दिव्यांगाच्या दारी

## कार्यक्रमाचे उद्या चिंचवड येथे आयोजन

पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।

**दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगाच्या दारी' या अभियानाअंतर्गत जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांना विविध योजनांचा लाभ देण्यासाठी अभियानाचे अध्यक्ष आणि राज्यस्तरीय समितीचे मुख्य मार्गदर्शक ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांच्या उपस्थितीत मंगळवार २२ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.**



### संधीचा लाभ घेण्याचे आवाहन

» पुणे व पिंपरी चिंचवड शहर तसेच जिल्हातील अधिकाधिक दिव्यांग बांधवांनी सहभागी होऊन या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन पुणे महानगरपालिका आयुक्त विक्रम कुमार, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांनी केले आहे.

यावेळी विविध विभागांच्या योजनांचे माहिती देणारे स्टॉल येथे लावण्यात येणार आहे. यामध्ये दिव्यांग प्रमाणपत्रासाठी नावनोंदणी करण्यात येणार असून उत्पन्नाचा दाखला, शिधापत्रिका, आधार नोंदणी, आयुष्मान भारत कार्ड वितरण, मतदार नोंदणी, संजय गांधी निराधार योजनेचा लाभ, जाती प्रमाणपत्र आदींच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येणार आहेत. योजनांच्या लाभाची प्रक्रिया पद्धती आदीबाबत माहिती देण्यात येणार आहे.पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे महानगरपालिका तसेच पुणे जिल्हा परिषदेच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या दिव्यांग कल्याणासाठीच्या योजनांची माहिती देणारे स्टॉलही उभारण्यात येणार आहेत. आरोग्य विभागाच्यावतीने मानसिक आरोग्य, संसर्गजन्य आजार कार्यक्रम, व्यसनमुक्ती समुपदेशन, मोतीबिंदू निदान, नेत्र तपासणीबाबतचे स्टॉल लावण्यात येणार असून योग शिबीरही आयोजित करण्यात येणार आहे. उपस्थित राहणाऱ्या दिव्यांग बांधवांची आरोग्य तपासणी देखील यावेळी करण्यात येणार आहे. दिव्यांग वित्त व विकास महामंडळ, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार विकास महामंडळ, महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ आदी महामंडळांच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या विविध कर्ज योजना, अनुदान योजनांसाठी लाभार्थ्यांचे अर्ज भरुन घेणे, प्रस्ताव तयार करण्यासाठी दिव्यांग बांधवांना मदत करण्यात येणार आहे.'दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगाच्या दारी' अभियानांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात विविध योजनांच्या लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरुपात लाभाचे वितरणही करण्यात येणार आहे.

# यमुनानगरमध्ये गाय आणि वासराला लंपीची लागण



निगडी । न्यूज एक्सप्रेस मराठी।

यमुनानगर येथे लंपीची साथ पसरल्याचे समोर आले आहे, अशी माहिती सचिन चिखले यांनी दिली. आज दुपारी सचिन चिखले यांना यमुनानगर येथे स्कीम नंबर १०, सुवर्णयोग मित्र मंडळ येथून फोन आला. यावेळी घटनास्थळी चिखले यांनी तात्काळ धाव घेतली. यावेळी एक गाय आणि तीचे वासरू तडफडत असल्याचे निदर्शनास आले.गाय आणि तीचे वासरू यांना लंपी आजार झाल्याचे समोर आले आहे. परंतु, काही वेळातच गायीचा मृत्यू झाला. यावेळी तात्काळ चिखले यांनी पशुवैद्यकीय अधिकारी दगडे यांना फोन करून त्यांची सर्व पशुवैद्यकीय विभागाची टीम घटनास्थळी दाखल झाली. मयत गाईला गाडीमध्ये ठेवण्यात आले. यावेळी बाजूला (धर्मीपरपरसरअ) असणाऱ्या २ गायींचे लसीकरण करण्यात आले. तर पुढील दोन ते तीन दिवसात प्रभागातील सर्व गाई आणि वासरे यांचे लवकरात लवकर लसीकरण करून घेण्यात यावे अशी माहिती दगडे साहेब व त्यांची आरोग्य विभागाची टीमला देण्यात आली आहे. यावेळी सचिन चिखले यांच्यासोबत प्रसाद कोलते, बाबा परब, प्रमोद बोबे, रोहित काळभोर, आरोग्य विभागाचे मांढरे, सोमनाथ काळभोर, ओमकार पवार व त्यांच्या मित्रपरिवाराने मदत केली. पुढे सर्व गाई वासरांचे लंपी आजाराचे लसीकरण करण्यात येणार असल्याची माहिती चिखले यांनी दिली.